## <u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>

नि.फौ.ख.क्र. ६६/२००९

सरकार –वि– शकील उर्फ बबलु

नि.क्र.२३

## <u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – रामेश्वर दयाराम बघे,

वय. ६७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहाय्यक फौजदार,

राहणार – खामगाव, ता. खामगाव, जिल्हा – बुलडाणा.

## <u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>

१. सन २००९ मध्ये मी शेगाव शहर पोलीस स्टेशन येथे सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होतो. सन २००९ मध्ये अपराध क्र.८१/२००९ भादवी कलम ४५७ए ३८० या केसचा तपास माझ्याकडे देण्यात आला होता. माझ्या पूर्वी या प्रकरणात तपास अधिकारी कोण होते याबाबत मला माहिती नाही. रिपोर्टवरुन घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. फिर्यादीचा जबाब नोंदविला. तपासादरम्यान आरोपीचा शोध घेवून आरोपीला पकडले व त्याला अटक केली. आता मला अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते. मेमोरंडम पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. आता मला मेमोरंडम पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.२५</u>** देण्यात येते. मेमोरंडम पंचनाम्यानुसार चोरीस गेलेला माल मी लपवून ठेवला आहे व तो मी काढून देतो असे आरोपीने सांगितले होते. दोन आरोपींनी चोरीस गेलेला माल विभागला होता. त्यानुसार मी शेख शकील शेख बबलु याला घेवून उरळ, ता. बाळापुर, जि. अकोला येथे घेवून गेलो होतो. आरोपीने त्याच्या भावाच्या घराच्या टिनशेडवर चोरीस गेलेला माल लपवून ठेवला होता. तो माल जप्त करुन ताब्यात घेतला. त्याठिकाणी आम्हाला नऊ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला होता. पंचनामा करुन सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.२६</u>** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपी शेख ईस्माईला घेवून जामोद येथे गेलो. शेख ईस्माईल याने त्याच्या घरी लपवून ठेवलेला माल काढून दिला. त्याच्याकडून आम्ही मोबाईल, चार्जर, पेन ड्राईव्ह असा एकुण १०,२००/– रुपयांचा माल मेमोरंडम

पंचनाम्यानुसार जप्त केला. आता मला मेमोरंडम पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२७** देण्यात येते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, दोन पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२८** देण्यात येते. आता मला दि.१०.०७.२००९ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.२९** देण्यात येते. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व हेड मोहररची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३०** देण्यात येते. आता मला दि.१४.०७.२००९ रोजीची मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व हेड मोहररची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३१** देण्यात येते. तपासाअंती आरोपींनी फिर्यादीच्या दुकानातून मोबाईल व इतर इलेक्ट्रानिक्स वस्तु चोरल्याचे निष्पन्न झाल्यामुळे दोषारोपपत्र तयार करुन न्यायालयात दाखल केले. आता मला शेख शकील याचा अटक पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, आरोपीची व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **नि.क्र.३२** देण्यात येते. मी आरोपींना बघितले तर ओळखु शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही. साक्षीदार आता सांगतो की, मला दोन्ही फरार आरोपींचे पत्ते माहिती आहेत. शेख ईस्माईल हा जळगाव जामोद येथे बेंबडेश्वर मंदिराच्या जवळ दुधाचा धंदा करतो व दुसरा आरोपी बुऱ्हाणपुर येथील गणेशपुर पोलीस स्टेशनच्या समोरच्या झोपडपट्टीत राहतो व त्याची सासरवाडी जळगाव जामोद आहे.

**सरतपास संपला.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१३.०४.२०२६ | दि.१३.०४.२०२६ |